# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांकः15.08.2024** **वारःगुरुवार**

---

1. भारतीय स्वातंत्र्याच्या वर्धापनदिनाचा देशभरात जल्लोष, राजधानी दिल्लीतल्या लाल किल्ल्यावर ध्वजारोहणाचा मुख्य कार्यक्रम
2. मुंबई आणि पुण्यात राज्यातले ध्वजारोहणाचे मुख्य शासकीय कार्यक्रम
3. स्वातंत्र्यदिनाच्या पूर्वसंध्येला राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांचं देशवासियांना संबोधन
4. हर घर तिरंगा अभियानात कालही वैविध्यपूर्ण कार्यक्रम
5. पोलिस अधिकारी कर्मचारी यांचा पोलिस पदकं देऊन सन्मान; राज्यातल्या 59 पोलिसांचा समावेश आणि,
6. राज्य सांस्कृतिक कार्य विभागाचा चित्रपती व्ही. शांताराम जीवनगौरव पुरस्कार ज्येष्ठ अभिनेते शिवाजी साटम यांना; तर राज कपूर जीवनगौरव पुरस्कार ज्येष्ठ अभिनेत्री आशा पारेख यांना जाहीर

**स्वातंत्र्यदिन**

देशाच्या स्वातंत्र्यदिनाचा वर्धापनदिन आज साजरा होत असून सर्वत्र उत्साह आणि जल्लोषाचं वातावरण आहे. देशातली शासकीय निमशासकीय कार्यालये, ऐतिहासिक वास्तू, रस्ते राष्ट्रध्वजाच्या रंगांच्या विद्युत रोषणाईनं नटली आहेत.

स्वातंत्र्यदिनाच्या देशातल्या मुख्य कार्यक्रमात आज प्रथेप्रमाणे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते लाल किल्ल्यावर ध्वजारोहण करण्यात येईल. पंतप्रधान त्यानंतर देशाला संबोधित करतील. या वर्षीच्या स्वातंत्र्यदिनाची संकल्पना 'विकसित भारत @ 2047' अशी आहे. भारताचं स्थान 2047 या वर्षापर्यंत विकसनशील नाही तर विकसित राष्ट्रांच्या यादीत यावं, यासाठी सरकार सर्व बाजूंनी करत असलेल्या प्रयत्नांचा जागर या स्वातंत्र्यदिनी केला जाईल.

स्वातंत्र्यदिनाच्या कार्यक्रमात जनसहभाग वाढावा यासाठी, लाल किल्ल्यावर होणाऱ्या कार्यक्रमात समाजातल्या सर्व स्तरांतल्या सुमारे सहा हजार विशेष अतिथींना आमंत्रित करण्यात आलं आहे. ऑलिंपिक खेळाडू, विविध राष्ट्रीय स्पर्धांमधले विजेते, सैनिकी शाळांमधील विद्यार्थी हे ही लाल किल्ल्यावर उपस्थित असतील.

**राज्य-स्वातंत्र्यदिन**

स्वातंत्र्य दिनानिमित्त ध्वजारोहणाचा मुख्य शासकीय समारंभ राज्यात एकाच वेळी सकाळी 9 वाजून 5 मिनिटांनी आयोजित करण्यात आला आहे. या कार्यक्रमात सर्वांना सहभागी होता यावं यासाठी सकाळी 8 वाजून 35 मिनिटांपासून 9 वाजून 35 मिनिटे या वेळेत इतर कोणताही शासकीय किंवा निमशासकीय समारंभ आयोजित करण्यात येऊ नये, असे आदेश देण्यात आले आहेत.

राज्यातल्या मुख्य शासकीय कार्यक्रमात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते मंत्रालयात तर पुण्यात राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांच्या हस्ते विधान भवनात ध्वजारोहण होणार आहे. तर प्रत्येक जिल्ह्याच्या मुख्यालयाच्या ठिकाणी संबंधित पालकमंत्री अथवा अन्य मंत्री यांच्यामार्फत ध्वजारोहण करण्यात येईल.

**द्रौपदी मुर्मू**

स्वातंत्र्यदिनाच्या पूर्वसंध्येला प्रथेनुसार राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी देशवासियांना संबोधित केलं. भावी पिढ्यांच्या आकांक्षा- यांना एका शृंखलेत गुंफणाऱ्या परंपरेचा आपण एक अंश आहोत, याची प्रचिती आपल्याला येत असल्याचं त्या

म्हणाल्या. स्वातंत्र्यदिनाचा आनंद व्यक्त करताना फाळणी वेदना दिनाच्या स्मृतीही राष्ट्रपतींनी जागवल्या. संविधानातल्या न्याय, समानता, स्वातंत्र्य आणि बंधुभाव या आदर्शांवर दृढ राहण्याचं आवाहन त्यांनी देशवासियांना केलं. सार्वत्रिक निवडणुका, जी-20 चं यशस्वी आयोजन, सर्वाधिक वेगानं वाढणाऱ्या अर्थव्यवस्थेबद्दल अभिमान आणि विकसित भारताचं स्वप्न पूर्ण होण्यासाठी करण्यात येत असलेले विविध उपाय, महिला सबलीकरण, क्रीडा क्षेत्रातली प्रगती, कौशल्यविकास याचा त्यांनी उल्लेख केला. 'राजकीय लोकशाहीला सामाजिक लोकशाही म्हणूनही घडवलं पाहिजे' या डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांना त्यांनी उद्धृत केलं.

**<u>राज्यपाल</u>**

स्वातंत्र्यदिनाच्या पूर्वसंध्येला राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांनीही राज्यातल्या जनतेला स्वातंत्र्य दिनानिमित्त शुभेच्छा दिल्या आहेत. महाराष्ट्राला संत आणि समाजसुधारकांच्या विचारांचा समृद्ध वारसा लाभला आहे. स्वातंत्र्य मिळाल्यापासून महाराष्ट्रानं सामाजिक, आर्थिक विकासात उल्लेखनीय प्रगती केली आहे. आगामी काळात समृद्ध आणि सर्वसमावेशक अशा विकसित भारताचं स्वप्न साकार करण्यात महाराष्ट्र निर्णायक भूमिका बजावेल, असा विश्वास राज्यपालांनी आपल्या संदेशात व्यक्त केला आहे.

**<u>हर घर तिरंगा</u>**

स्वातंत्र्य दिनाच्या पार्श्वभूमीवर राज्यात सर्वत्र 'हर घर तिरंगा अभियान' जल्लोशात सुरु आहे. कोल्हापूरमध्ये काल तिरंगा देशभक्ती दौडचं आयोजन करण्यात आलं होतं. तर रत्नागिरीमध्ये आपत्ती व्यवस्थापनासंदर्भात जनजागृतीसाठी मिनी मॅरेथॉनचं आयोजन करण्यात आलं होतं. धुळे शहरातून काल भव्य तिरंगा यात्रा काढण्यात आली. एक हजार 111 फूट लांबीचा तिरंगा यात्रेचं विशेष आकर्षण ठरला.नाशिक महापालिकेच्या वतीनंही तिरंगा पदयात्रा काढण्यात आली. चंद्रपूर महानगरपालिकेतर्फे तयार करण्यात आलेल्या प्रचार रथाला काल हिरवा कंदील दाखवण्यात आला. परभणीत एका चित्रकला स्पर्धेचं आयोजन करण्यात आलं होतं. तर नवी मुंबईत ई बाइक आणि सायकलसह पर्यावरणपूरक तिरंगा रॅलीचा एक अभिनव उपक्रम करण्यात आला.

**<u>फाळणी वेदना</u>**

स्वातंत्र्यदिन उत्साहात साजरा केला जात असताना देशाच्या फाळणीच्या वेदनांची आठवणही अपरिहार्य. देशात काल फाळणी वेदना दिनाचं पालन करण्यात आलं. देशाच्या फाळणीच्या काळात प्रभावित झालेल्या व्यक्तींना पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी समाजमाध्यमावर लिहिलेल्या संदेशाद्वारे आदरांजली वाहिली आहे. राज्यातही विविध कार्यक्रमांमधून फाळणीमुळे असंख्य लोकांवर झालेले भयंकर परिणाम आणि सहन कराव्या लागलेल्या वेदना यांचं स्मरण करण्यात आलं. सोलापुरात भारत-पाक फाळणीत घडलेल्या घटना, घडामोडी याचबरोबर स्वातंत्र्य संग्रामात घडलेल्या महत्वपूर्ण घटना, ऐतिहासिक स्थळे, क्रांतिकारक आणि राष्ट्रपुरुषांची माहिती देणाऱ्या दुर्मिळ छायाचित्रांचं मल्टीमीडिया प्रदर्शन सोलापूर रेल्वे स्थानकात भरविण्यात आलं आहे. हे प्रदर्शन उद्यापर्यंत सर्वांसाठी खुलं आहे.

**<u>पोलिस पदकं</u>**

पोलीस सेवेतल्या उल्लेखनीय कार्यासाठी स्वातंत्र्यदिनाच्या पूर्व संध्येला केंद्रीय गृह मंत्रालयाकडून देशातल्या 908 पोलिस अधिकारी कर्मचारी यांना पोलिस पदकं देऊन सन्मानित करण्यात आलं. यामध्ये राज्यातल्या 59 पोलिसांचा समावेश आहे.

राज्यातल्या चिरंजीवी रामछाबिला प्रसाद, राजेंद्र बालाजीराव डहाळे, सतीश राघवीर गोवेकर या पोलिस अधिकाऱ्यांना विशिष्ट सेवेसाठी 'राष्ट्रपती पोलीस पदक' प्रदान करण्यात आलं. यासह राज्यातल्या 17 पोलिस अधिकाऱ्यांना आणि कर्मचाऱ्यांना 'पोलीस शौर्य पदक' तर 39 पोलिसांना गुणवत्तापूर्ण सेवेसाठी 'पोलीस पदक' प्रदान करण्यात आली.

'राष्ट्रपती पोलीस शौर्य पदक' आणि 'पोलीस शौर्य पदक', जीवन आणि मालमत्ता यांचं संरक्षण, गुन्हेगारीला पायबंद आणि गुन्हेगारांना अटक करण्यासाठी उल्लेखनीय शौर्यासाठी दिलं जातं. पोलीस सेवेतल्या खास उल्लेखनीय कामगिरीसाठी 'राष्ट्रपती पोलीस पदक' तर कर्तव्यनिष्ठेनं बजावलेल्या गुणवत्तापूर्ण आणि अमूल्य सेवेसाठी 'पोलिस पदक' प्रदान केलं जातं.

**<u>राज्य मराठी चित्रपट पुरस्कार</u>**

राज्य शासनाच्या सांस्कृतिक कार्य विभागाच्या वतीनं देण्यात येणारा 2023 या वर्षाचा चित्रपती व्ही. शांताराम जीवनगौरव पुरस्कार ज्येष्ठ अभिनेते शिवाजी साटम यांना आणि राज कपूर जीवनगौरव पुरस्कार ज्येष्ठ अभिनेत्री आशा पारेख यांना जाहीर करण्यात आला आहे. सांस्कृतिक कार्यमंत्री सुधीर मुनगन्टीवार यांनी काल या पुरस्कारांची घोषणा केली.

चित्रपती व्ही. शांताराम विशेष योगदान पुरस्कार हा लेखक, दिग्दर्शक तसंच अभिनेता दिग्पाल लांजेकर यांना आणि राज कपूर विशेष योगदान पुरस्कार हा ज्येष्ठ लेखक, दिग्दर्शक, संकलक एन. चंद्रा यांना जाहीर करण्यात आला आहे. या पुरस्कारांचं वितरण येत्या 21 तारखेला मुंबईत एका समारंभात होणार आहे.

महाराष्ट्र राज्य मराठी चित्रपट 58 व्या आणि 59 व्या पुरस्कारांच्या अंतिम फेरीची नामांकनंही काल सांस्कृतिक कार्यमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी जाहीर केली. सर्वोत्कृष्ट चित्रपटांसाठी दहा चित्रपटांना तर प्रथम पदार्पण चित्रपट निर्मिती तसंच दिग्दर्शनासाठीही नामांकनं जाहीर करण्यात आली.

**<u>आकाशवाणी प्रसारण</u>**

गेल्या दोन वर्षांपासून बंद असलेलं आकाशवाणीच्या अहमदनगर केंद्राचं सायंकालीन प्रसारण आजपासून पुन्हा सुरू होणार आहे. आकाशवाणी अहमदनगर केंद्राचे कार्यक्रम विभागप्रमुख राजेंद्र दासरी यांनी ही माहिती दिली आहे. श्रोत्यांना आजपासून मुंबई केंद्रावरच्या सहक्षेपित कार्यक्रमांऐवजी स्थानिक प्रसारण ऐकायला मिळणार आहे.

**<u>परिसंवाद</u>**

राज्य महिला आयोगाच्या वतीनं 'महिला सुरक्षा आणि सामाजिक मानसिकता' परिसंवादांचं काल मुंबईत आयोजन करण्यात आलं होतं. महिलांविरोधातील वाढते गुन्हे, तरुणांमधील गुन्हेगारी प्रवृत्ती, डिजिटल माध्यमांचे होणारे परिणाम, समाजाची मानसिकता, महिलांच्या सुरक्षिततेसाठी असलेल्या उपाय योजना यावर परिसंवादात चर्चा करण्यात आली.

**<u>गोयल बैठक</u>**

मुंबईतले रखडलेले विविध प्रकल्प मार्गी लावण्यासंदर्भात तसंच वाहतूक कोंडीचा प्रश्न सोडविण्यासाठी महत्वपूर्ण निर्णय घेण्यात आले असल्याची माहिती केंद्रीय वाणिज्य मंत्री पियूष गोयल यांनी काल पत्रकार परिषदेत दिली. मुंबई महानगरपालिका, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, म्हाडा आणि एमएमआरडीएच्या अधिका-यांसोबत झालेल्या संयुक्त बैठकीनंतर गोयल यांनी ही माहिती दिली.

**<u>हवामान</u>**

सांगली जिल्ह्यातील तासगाव, मिरज तालुक्यात काल जोरदार पाऊस झाला. दिवसभर हवेत उकाडा जाणवत होता. राज्यात तुलनेनं हवामान कोरडं असून त्यात फारसा बदल संभवत नाही. मात्र तुरळक ठिकाणी पावसाच्या हलक्या सरींचा अंदाज हवामान विभागानं वर्तवला आहे.

**आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं.**

**नमस्कार.**